




मराठी साप्ताहिक

संपादकः शिवम राजेंद्र वखरे

# निसर्ग चक्र

■ कार्यकारी संपादिका
सौ. सिमा राजेंद्र वखरे

■ Postal Regd.No. THC/262/2023-2025
■ RNI.No. MAHMAR/2022/83338
■ E Mail : nisargchakra2001@gmail.com

■ वर्ष : ०२
■ अंक : ४१
■ पाने : ४
■ कल्याण, जि. ठाणे
■ मंगळवार, दि. १६ एप्रिल ते २२ एप्रिल २०२४
■ मूल्य : रु ५.००/-
■ आर. एन. आय.नं. एमएएचएमएआर/२०२२/८३३३८

■ Vol : 02 ■ Issue : 41 ■ Marathi Weekly ■ Pages : 4 ■ Kalyan, Dist Thane ■ Tuesday, Date : 16 April To 22 April 2024 ■ Price 5.00 /-


## घरगुती गॅस सिलेंडर मधून अवैधरित्या गॅस काढणारे रॅकेट पकडले

**डोंबिवली** :- (सौ. सीमा वखरे) :- डोंबिवली : लोकसभा निवडणूक सन २०२४ च्या अनुषंगाने पोलीस ठाणे हद्दीत कोणत्याही प्रकारचे अवैद्य धंदे, हातभट्टी दारू, मादक पदार्थ विक्री, अवैद्य हत्याराची विक्री होणार नाही याबाबत पोलीस आयुक्त ठाणे शहर यांचे आदेश पोलिसांना प्राप्त झालेले होते. त्या अनुषंगाने मानपाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत कोणतेही अवैद्य प्रकार चालणार नाही याची काटेकोरपणे दक्षता घेण्यात येत असतानाच अशा प्रकारचे लपून-छपून अवैद्य धंदे करणारे यांचा शोध चालू असताना मानपाडा पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक प्रशांत आंधळे व पथकास गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की मानपाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील विको नाका कल्याण शीळ रोड डोंबिवली पूर्व येथे काही इसम हे भारत गॅस कंपनीचे घरगुती गॅस सिलेंडर मधून प्रत्येकी दोन किलो गॅस काढून तो कमर्शियल गॅस सिलेंडर मध्ये भरून कमी वजनाचे गॅस सिलेंडर हे ग्राहकांना वितरित करीत असतात. अशी माहिती मिळाली असता सहायक पोलीस निरीक्षक प्रशांत आंधळे व पथक यांनी विको नाका कल्याण शिळफाटा रोड डोंबिवली पूर्व येथे सापळा रचून मारुती सुझुकी कॅरी सीएनजी टेम्पो क्रमांक एम एच ०५ ई एल ५२८९ मधून भारत गॅस कंपनीचे सिलेंडर वितरित करणे करता घेऊन जात असताना घरगुती पस्तीस व कमर्शियल ९ असे एकूण ४४ व गॅस सिलेंडर मिळून आले तसेच अवैद्यपणे गॅस सिलेंडर टेम्पो ,कंप्रेसर पिस्टन, इलेक्ट्रिक वजन काटा असा एकूण चार लाख ६७ हजार ५८५/- रुपये किमतीचा मुद्देमाल; हस्तगत करण्यात आला. मानपाडा पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर ५४०/२०२४ भारतीय दंड विधान कायदा कलम २८५, ३३६ ,34 सह अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ चे कलम ३,७,८ अन्वये प्रमाणे नोंद करण्यात आली आहे .



तसेच या गुन्ह्यात आरोपी नामे सुजय कदम वय वर्ष ३०, राहणार चिकनघर, कल्याण पश्चिम, पप्पू मिश्रा वय वर्ष ३२ राहणार टाटा नाका, पिसवली गाव,कल्याण पूर्व, उत्तम बनकर वय वर्ष ५५ राहणार आनंदनगर मिलिंद नगर कल्याण पूर्व यांना अटक करण्यात आली आहे. या गुन्ह्यात संदर्भात दत्तात्रय शिंदे अप्पर पोलीस आयुक्त पूर्व प्रादेशिक विभाग कल्याण, सचिन गुंजाळ पोलीस उप आयुक्त परिमंडळ ३कल्याण ,आणि सुनील कुराडे सहायक पोलीस आयुक्त डोंबिवली विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली विजय कादबाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक मानपाडा पोलीस ठाणे यांच्या नेतृत्वाखाली राम चोपडे (पो. निरी. गुन्हे) दत्तात्रय गुंड (पो. निरी प्रशासन ), राहुल मस्के पो.नि ,सहायक पोलीस निरीक्षक प्रशांत आंधळे ,सहायक पोलीस निरीक्षक संपत फडोळ सहायक पोलीस निरीक्षक राळेभात व पथकाने परिश्रम घेतले.

### मानपाडा पोलीसांची उत्तम कामगिरी

**गॅसच्या घरगुती गॅस सिलेंडर मधून अवैद्यरित्या गॅस काढून कमर्शियल गॅस सिलेंडर मध्ये भरून कमी वजनाचे गॅस सिलेंडर हे ग्राहकांना वितरित करत असल्याचे रॅकेट उध्वस्त केले.**

## यूपीएससीचा निकाल जाहीर

### महाराष्ट्रातील उमेदवारांचा दबदबा कायम

नुकताच यूपीएससी २०२३-२४ चा निकाल जाहिर करण्यात आलाय. यामध्ये महाराष्ट्रातील उमेदवारांनी धमाकेदार कामगिरी केल्याचे बघायला मिळत आहे.




यूपीएससीचानिकाल जाहीर, महाराष्ट्रातील उमेद वारांचा दबदबा कायम नुकताच यूपीएससीचा निकाल जाहिर करण्यात आलाय. या निकालामध्ये महाराष्ट्रातील उमेदवारांचा दबदबा हा बघायला मिळतोय. या परीक्षेत आदित्य श्रीवास्तव याने टॉप केले आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगाने सिव्हिल सेवा परीक्षा २०२३ चा हा अंतिम निकाल जाहीर केला आहे. या निकालात महाराष्ट्रातील उमेदवारांना घणघणीत यश मिळाले. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत ऑल इंडिया रँकींनुसार अर्चित डोंगरेला १53 रँक मिळाली आहे. हेच नाही तर पहिल्या १०० जणांच्या यादीमध्ये अनिकेत हिरडे ८१ व्या रँकवर आहे.

या परीक्षेचा निकाल उमेदवारांना upsc.gov.in या साईटवर बघता येईल. २०२३मध्ये यूपीएससीकडून ११४३ पदांसाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानंतर मुख्य परीक्षेमध्ये पास झालेल्या उमेदवारांना ९ एप्रिल २०२४ रोजी परीक्षेसाठी बोलवण्यात आले होते आणि आज याचा निकाल जाहिर करण्यात आला. विशेष म्हणजे या निकालात ७० हून अधिक उमेदवार हे महाराष्ट्रातील आहेत. या परीक्षेसाठी देशभरातून लाखो विद्यार्थी हे अर्ज करतात. मात्र, परीक्षेमध्ये काही प्रमाणात विद्यार्थी उत्तीर्ण होतात. त्यानंतर मुलाखती पार पडतात आणि या मुलाखतींमधून शेवटी निवड केली जाते. यूपीएससीची परीक्षा अत्यंत अवघड असते. उमेदवार या परीक्षेची तयारी अनेक वर्षे करतात.

## कल्याण पूर्व परिसरात महाविद्यालयीन/ शालेय /शिक्षक यांच्या माध्यमातून जनमानसामध्ये मतदानाविषयी जनजागृती!

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ अंतर्गत २४- कल्याण लोकसभा मतदार संघातील , १४२- कल्याण पूर्व विधानसभा मतदारसंघात , मतदार जनजागृतीसाठी स्विप पथकातील (मतदार जनजागृती पथक) महापालिकेचे शिक्षणाधिकारी तथा नोडल अधिकारी विजय सरकटे यांच्या मार्गदर्शनाखाली आज सर्व शाळा व महाविद्यालयातील प्राचार्य व मुख्याध्यापक यांच्या मतदान जनजागृतीपर बैठकीचे आयोजन नूतन ज्ञान मंदिर शाळा येथे करण्यात आले होते.



सदर कार्यक्रमात उपस्थित प्राचार्य व मुख्याध्यापक यांना मतदानाचे महत्त्व पटवून देण्यात आले.तसेच त्यांनी आपल्या शाळा व महाविद्यालयातील शिक्षकांना मतदान जनजागृती पर कार्यक्रम करण्याबाबत प्रोत्साहित करावे त्याचप्रमाणे आपल्या शाळा व महा विद्यालयात चुनाव की पाठशाळा या विषयावर पालकांची बैठक आयोजित करावी आणि इतर मतदान जनजागृती पर कार्यक्रम करावेत अशा सूचना देण्यात आल्या.

सदर ठिकाणी ध्वनि क्षेपकाद्वारे मतदान जनजागृतीपर गीत वाजवून उपस्थितांना मोठ्या प्रमाणात मतदान करणे बाबत आवाहन करण्यात आले

## विविध 'मोबाईल ॲप'च्या माध्यमातून मतदारांना सोई- सुविधा

### मतदार व उमेदवारांनी लाभ घेण्याचे सातारा जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र डुडी यांचे आवाहन

सातारा :- भारत निवडणूक आयोगाने विविध मोबाईल ॲपच्या माध्यमातून मतदारांना सोई- सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. तरी या ॲपचा जिल्ह्यातील मतदारांनी व उमेदवारांनी वापर करून आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करून घ्यावी, असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले आहे.

C-VIGIL (Citizen's Vigilance Initiative on Electoeral malperactic-es) हे भारतीय निवडणूक आयोगाने विकसित केलेले मोबाइल ॲप्लिकेशन आहे जे निवडणुकीदरम्यान आदर्श आचारसंहिता चे उल्लंघन झाल्यास तक्रार करण्यासाठी नागरिकांना सक्षम करते. मतदारांना प्रभावित करण्यासाठी रोख, दारू किंवा भेटवस्तूंचे वाटप, द्वेषयुक्त भाषणे, बंनर किंवा पोस्टर्स आणि निवडणुकीच्या निष्पक्षतेवर परिणाम करू शकणाऱ्या इतर संबंधित क्रियाकलापांसारख्या निवडणूक गैरव्यवहारांच्या घटनांचा अहवाल देण्यासाठी ॲपची रचना करण्यात आली आहे.

CVIGIL ॲप वापरून, नागरिक आचार संहिता उल्लंघनाची छायाचित्रे किवा व्हिडिओ कॅप्चर करून आणि स्थान तपशीलांसह अशा घटनांची तक्रार करू शकतात. ॲप रिपोर्टरच्या ओळखीची गोपनीयता सुनिश्चित करते आणि त्यांना त्यांच्या तक्रारीची स्थिती ट्रॅक करण्यास अनुमतो देते. ॲपद्वारे सादर केलेले अहवाल पुढील कार्यवाहीसाठी तत्काळ संबंधित निवडणूक अधिकाऱ्यांकडे पाठवले जातात.


VIGIL ॲपचे उद्दिष्ट पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि निवडणूक प्रक्रियेतील नागरिकांच्या सहभागाला चालना देण्याचे आहे. नागरिकांना उल्लंघनाची तक्रार करण्याचे अधिकार देऊन, ते निवडणुकीची अखंडता राखण्यात मदत करते आणि सर्व उमेदवार आणि राजकीय पक्षांसाठी समान संधीचे क्षेत्र सुनिश्चित करते.

2. Voteer Helpline App:-मतदार हेल्पलाईन ॲप्लिकेशनला इलेक्ट्रोरल सर्च, फॉर्म सबमिशन, तक्रारी, उमेदवाराचे प्रतिज्ञापत्र आणि निकाल लोकप्रिय केले जातात.

Saksham ECI App:- दिव्यांग मतदारला मतदान करण्यासाठी नोंदणी करण्यासाठी, त्यांचे मतदान केंद्र शोधण्यात आणि मतदान करण्यासाठी मदत करण्यासाठी Saksham ॲप अनेक सुविधा प्रदान करते. त्यामध्ये खालील वैशिष्ट्यांचा समावेश आहे:

व्हॉईस सहाय्य: ॲप दृष्टिहीन असलेल्या दिव्यांग मतदार साठी आवाज सहाय्य प्रदान करते. 2. टेक्स्ट-टू-स्पीच: ॲप श्रवणदोष असलेल्या दिव्यांग मतदारसाठी टेक्स्ट-टू-स्पीच सहाय प्रदान करते. प्रवेश योग्यता वैशिष्ट्ये: ॲपमध्ये अनेक प्रवेश योग्यता वैशिष्ट्ये आहेत, जसे की मोठे फॉन्ट, उच्च- कॉन्ट्रास्ट रंग, इ.

मतदान केंद्रांविषयी माहिती: ॲप मतदान केंद्रांबद्दल माहिती प्रदान करते, ज्यामध्ये मतदान केंद्राचे स्थान, मतदान केंद्रावर उपलब्ध प्रवेश योग्यता वैशिष्ट्ये आणि मतदान अधिकाऱ्यांच्या संपर्क तपशीलांचा समावेश आहे.



तक्रारी: ॲप दिव्यांग मतदारला निवडणूक प्रक्रियेत सहभागी होताना येणाऱ्या कोणत्याही समस्यांबद्दल तक्रारी नोंदवण्याची परवानगी देते.

ENCORE App :- या ॲपमध्ये सुविधामध्ये उमेदवार नामांक न डिजीटल करण्यासाठी योग्य आयसोटी हेल्पडेस्क केले गेले आहे का. सर्व नामांकन ENCORE ऍप्लिकेशनवर १००% डिजीटल केले आहेत की नाही.

सर्व रिटर्निंग अधिकारी केवळ ENCORE येथे नामनिर्देशनांसाठीच्या सर्व अर्जाची छाननी करत आहेत आणि स्वीकृत, नाकारलेले/माघार घेतलेले म्हणून योग्यरित्या चिन्हांकित करत असल्याची खात्री केली जाते. Suvidha Peermission App:-

सर्व परवानग्या सुविधांव्दारे हाताळल्या आहेत की नाही? सर्व परवानग्या निर्धारित वेळेत दिल्या आहेत की नाही सर्व परवानग्या निर्धारित वेळेत दिल्या आहेत की नाही याची माहिती या ॲपव्दारे पुरविली जाते. Suvidha Candidate App:-उमेदवारांना परवानगीची स्थिती आणि नामांकन स्थितीचा पाठपुरावा करण्यासाठी याची माहिती या ॲपव्दारे पुरविली जाते.

तसेच नामांकन अर्ज व प्रतिज्ञापत्र भरता येते. सदरचे सर्व ॲप गुगल प्ले स्टोअर वर आणि आयफोन साठी ॲप्पल स्टोअरवर मोफत डाऊनलोड करण्यास उपलब्ध आहेत.

## भरपूर पाणी प्या उन्हाचा तडाखा वाढलाय

वाढता उकाडा नागरिकांसाठी त्रासदायक ठरतोय, उन्हामध्ये सतत काम केल्याने शरीरातील तापमान नियंत्रित करण्याच्या यंत्रणेत बिघाड होताना दिसतोय. कोणत्याही सुरक्षेशिवाय उन्हामध्ये



फिरल्यास उष्माघाताचा त्रास होण्याची शक्यता डॉक्टरांनी व्यक्त केली आहे

भरपूर पाणी प्या... उन्हाचा तडाखा वाढलाय, मुंबईसह 'या' शहरात उष्णतेची लाट अन्उन्हाची काहिली मुंबईमध्ये उन्हाचा तडाखा वाढलाय, वैषाख वणवा जाणवू लागलाय. दुपारनंतर बाहेर फिरताना नागरिकांना घामाच्या धारा लागत आहेत. वाढता उकाडा नागरिकांसाठी त्रासदायक ठरतोय, उन्हामध्ये सतत काम केल्याने शरीरातील **उर्वरीत पान२ वर...**

## पावन भूमी चॅरिटेबल ट्रस्ट तर्फे अंकुर बाल विकास केंद्रास धान्य व शैक्षणिक साहित्याचे वाटप

**डोंबिवली** :- (सौ. सीमा वखरे) :- चला पेटवू या दिवे, ज्या ठिकाणी अजूनही अंधार आहे . हे ब्रीद वाक्य घेऊन पावन भूमी चॅरिटेबल ट्रस्ट कल्याण ही सामाजिक संस्था गेल्या अकरा वर्षापासून विविध सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहे. दि.२३ एप्रिल २०२४ रोजी ट्रस्टचा ११ वा वर्धापन दिन साजरा होत आहे म्हणून ट्रस्टच्या मार्फत दि.१४ फेब्रुवारी २०२४ पासून तर दि. ३० एप्रिल २०२४ पर्यंत गरजू कुटुंबांना रेशन किटचे वाटप सुरू आहे . दि.१३ एप्रिल २०२४ पर्यंत ११२ कुटुंबांना रेशन किटचे वाटप करण्यात आले.यामध्ये गहू, तांदूळ, तेल, तूरडाळ, हरभरा डाळ त्याचबरोबर विद्यार्थ्यांसाठी वह्या, पेन ,पेन्सिल, चॉकलेट व मुलींसाठी सॅनिटरी पॅड इत्यादीचा समावेश त्यात होता.

अंकुर सामाजिक संस्थेचे अंकुर बाल विकास केंद्र हेदुटणे डोंबिवली येथे कार्यरत आहे या केंद्रास पावन भूमी चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने व समाजातील दानशूर व्यक्तींच्या सहकार्याने केंद्रातील विद्यार्थ्यांसाठी तांदूळ, तूरडाळ, मुगडाळ, हरभऱ्याची डाळ ,बेसन, चॉकलेट ,साखर ,रवा त्याचबरोबर विद्यार्थ्यांसाठी वह्या ,पेन ,पेन्सिली चॉकलेट असा खाऊ व मुलींसाठी सॅनिटरी पॅड सप्रेम भेट म्हणून देण्यात आले.

यावेळी संस्थेच्या संचालिका सौ.अक्षदाताई भोसले ताई यांनी त्यांचे मनोगत व्यक्त करतांना सांगितले की संस्था ही केंद्रात असलेल्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करीत आहे. सामाजिक काम करत असतांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते परंतु समाजातील दानशूर व्यक्ती मदतीला धावत असल्याचेही त्यांनी सांगितले. पावन भूमी चारिटेबल ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष राजेंद्र वखरे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, विविध सामाजिक संस्था विविध स्तरावर काम करीत असतात परंतु त्यांना संस्था चालवितांना त्याच बरोबर अनाथ मुले, सिंगल पेरेंट पाल्य ,मुलं-मुली यांचा सांभाळ करताना त्यांच्या सर्व जबाबदाऱ्या व शैक्षणिक जबाबदारी त्याचबरोबर आरोग्याची जबाबदारी पार पाडत असताना व त्यांना या देशासाठी उच्च दर्जाचे नागरिक घडविण्यासाठी अथक परिश्रम घ्यावे लागत असतात .



याकरिता समाजातील प्रत्येक घटकाचे कर्तव्य आहे की ,त्यांनी आपापल्या परिसरात ज्या संस्था कार्य करीत आहेत त्यांना आपण आर्थिक रूपात व धनधान्य व शैक्षणिक साहित्याच्या रूपात मदत करावी जेणेकरून त्या संस्था चांगल्या प्रकारे कार्य करू शकतील व त्यांना प्रेरणा मिळेल आणि आपण एका सामाजिक उपक्रमात सहभाग घेतल्याचा आनंद आपल्याला घेता येईल. यापुढेही ट्रस्ट जमेल तशी या बाल संस्कार केंद्रास मदत करेल असेही त्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले त्याचबरोबर या कार्यक्रमात बालाजी आंगण ठाकुर्ली, डोंबिवली मधील सामाजिक जाण म्हणून काही कुटुंबातील गृहिणी सहभागी झाल्या होत्या त्यांचेही त्यांनी आभार व्यक्त केले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी सौ .सीमा वखरे व .सौ वैशाली वाघ यांनी राजेंद्र वखरे यांच्या मार्गदर्शनाखाली परिश्रम घेतले

### सामाजिक संस्थांच्या उपक्रमांना मदत करणे ही काळाची गरज - राजेंद्र वखरे

# संपादकीय...



**आपण आपला स्वाभिमान कोणाला देऊच शकला नाही, तर तो तुमच्यापासून कोणीच हिरावून घेऊ शकत नाही. - महात्मा गांधी**

## दे दान; कोणते 'गिऱ्हाण'?

''भूक असताना अन्न सेवन केल्यास प्रकृती, नसताना केल्यास विकृती आणि भूक असतानाही आपल्यापेक्षाही अधिक भुकेलेल्यास ते दिल्यास ती संस्कृती'', अशा अर्थाचे आचार्य विनोबा भावे यांचे एक वचन आहे.

'भूक असताना अन्न सेवन केल्यास प्रकृती, नसताना केल्यास विकृती आणि भूक असतानाही आपल्यापेक्षाही अधिक भुकेलेल्यास ते दिल्यास ती संस्कृती', अशा अर्थाचे आचार्य विनोबा भावे यांचे एक वचन आहे. त्याचा आधार घेतल्यास आपल्या अनेक कंपन्या, उद्योग कसे संस्कृतीचे पाईक, संस्कृतिरक्षक इत्यादी आहेत हे पाहून अभिमानाने छाती फुलून येईल. या संस्कृतिरक्षणाचा साद्यांत तपशील 'द हिंदू" या दैनिकाने गुरुवारी प्रकाशित केला असून ज्यांस ते मुळातून वाचणे शक्य होणार नाही, त्यांच्यासाठी त्या वृत्तान्ताचा हा अन्वयार्थ.

कोणतीही व्यक्ती उद्योग वा व्यापारउदीम सुरू करते त्यामागे चार पैसे हाती पडावेत हा उद्देश असतो. त्यात काहीही गैर नाही. या अशा वैयक्तिक आशा-आकांक्षांतूनच स्वत:ची आणि इतरांचीही प्रगती होते. नपेक्षा उगाच 'आहे त्यात समाधान मानणे" वगैरे तत्त्वज्ञानाधारे जगू गेल्यास प्रगती खुंटते. आहे ती स्थिती बदलणे हेच कोणत्याही प्रगतिसाधकाचे उद्दिष्ट असते. अशी इच्छा व्यक्तीस वा व्यक्तिसमूहास आणि अंतिमत: देशास प्रगतीची नवनवी शिखरे काबीज करण्यास मदत करते. तेव्हा उद्योगामागील हा विचार मूळ. कोणी काही नवे हाती घेतो ते या ओढीने. म्हणजे कोणतीही व्यक्ती एखाद्या उद्योगास हात घालते ते काही त्या प्रदेशातील बेरोजगारी कमी व्हावी या हेतूने नाही. बेरोजगारी घटेल हा या उद्योगस्थापनेमागील सह-विचार. तो करण्याआधी संबंधित व्यक्तीने बाजारपेठेचा अभ्यास केलेला असतो आणि कोणत्या उत्पादनाची गरज बाजारपेठेत अधिक आहे आणि कोणत्या प्रकारे कमीत कमी खर्चात ते उत्पादन बाजारात आणून जास्तीत जास्त नफा मिळवता येईल, हा त्याचा विचार असतो. तो तसाच असायला हवा.

या अशा पद्धतीने 'धन जोडोनिया उत्तम व्यवहारे हे साध्य झाले की त्यापुढची स्थिती येते. ती म्हणजे हे धन 'उदास विचारे वेच करी', ही. चांगल्या मार्गाने व्यवसाय/ उद्योग करून उत्तम धन कमवायचे आणि त्यातील काही वाटा सत्कर्मार्थ द्यायचा हीच शहाणी, समंजस रीत. व्यवसायात काहीही नफा नाही, तिजोरीत खडखडाट, कर्मचाऱ्यांच्या रास्त मागण्या पुरवण्याइतकीही कमाई नाही आणि तरीही दानधर्म मात्र सढळ हस्ते असे होऊ शकत नाही. तसे असेल तर ते करणाऱ्या व्यक्तीच्या बौद्धिक स्थैर्याविषयी आणि दानधर्मार्थ रकमांच्या उगमाविषयी संशय घेता येईल. किंबहुना तो घ्यायला हवा.'द हिंदू'चे संशोधक वृत्त याच संदर्भातील आहे. त्यातून ज्या कंपन्यांच्या खात्यात कसलाही नफा नाही त्यांनीही राजकीय पक्षांस कशा अवाढव्य देणग्या दिल्या आणि या अवाढव्य देणग्यांतील अवाढव्य वाटा एकाच पक्षास कसा मिळाला याचा तपशील समोर येतो. त्याची दखल घेणे हे प्रबोधक आणि मनोरंजक असे दोन्ही एकाच वेळी ठरू शकेल. प्रबोधन करणारे म्हणायचे कारण भांडवलाची फेरगुंतवणूक, कर्मचाऱ्यांस अधिक वेतन इत्यादी कारणांपेक्षा आपले उद्योगपती राजकीय पक्षांवर अधिक रक्कम खर्च करू इच्छितात हे यातून दिसते आणि इतक्या साऱ्या राजकीय कृपाभिलाषींना एकाच वेळी पाहणे हे मनोरंजक ठरते.यानुसार १२ एप्रिल २०१९ ते २४ जानेवारी २०२४ या काळात ४५ कंपन्यांनी एकूण १४३२ कोटी रुपयांचे निवडणूक रोखे खरेदी केले.

हा काल-संदर्भ महत्त्वाचा. आधीच्या लोकसभा निवडणुका कधी झाल्या आणि यंदा सर्वोच्च न्यायालयाने हे प्रकरण कधी निकालात काढले या तारखा लक्षात घेतल्यास ही बाब ध्यानी येईल. या १४३२ कोटी रुपयांपैकी १०६८ कोटी रु. हे केंद्रातील सत्ताधारी पक्षास दिले गेले. हे प्रमाण साधारण ७५ टक्के इतके भरते. तथापि यातील प्रबोधक आणि मनोरंजक तपशील असा की हा इतका दानधर्म करणाऱ्या ४५ कंपन्यांपैकी ३३ कंपन्यांनी कमावलेला नफा वट्ट शून्य रु. अथवा उणे इतका आहे. परत या ३३ कंपन्यांखेरीज सहा कंपन्या अशा आहेत की त्यांनी खरेदी केलेल्या निवडणूक रोख्यांची रक्कम त्यांनी कमावलेल्या एकूण नफ्यापेक्षा किती तरी अधिक आहे. उर्वरित तीन कंपन्यांनी नफा कमावला. पण तरी त्यांनी कर भरल्याची नोंद नाही आणि अन्य तीन कंपन्यांनी किती कमावले, किती कर भरला याची कसलीही नोंदच उपलब्ध नाही. सदरहू वर्तमानपत्रातील पत्रकार आणि स्वतंत्र सांख्यिकी विश्लेषकांनी रोखे खरेदी करणाऱ्या तब्बल ३८५ कंपन्यांच्या ताळेबंदांची, जेथून रोखे खरेदी केले गेले त्या स्टेट बँकेने प्रसृत केलेल्या माहितीची आणि निवडणूक आयोगाने उघड केलेल्या तपशिलाची सविस्तर छाननी केली. या ३८५ कंपन्यांकडून एकत्रितपणे सुमारे ५३६२ कोटी रुपयांची रोखेखरेदी झाली आणि ती सर्व केंद्रीय सत्ताधारी पक्षाकडे वळती केली गेली, ही माहिती समोर येते. हे दानशूर कोण हे समजून घेणेही तितकेच आनंददायक!

उदाहरणार्थ यातील डीएलएफ लग्झरी होम या कंपनीची नोंद पाहा. उपरोल्लेखित काळात या कंपनीस झालेला तोटा १२८ कोटी रुपयांच्या आसपास आहे आणि तरीही या कंपनीचे दातृत्व असे की तिने २५ कोटी रुपयांचे रोखे खरेदी केले आणि ते सर्वच्या सर्व सत्ताधारी पक्षाच्या तिजोरीत गेले. विद्यामान सत्ताधारी पक्षाच्या कडव्या टीकाकार सोनिया गांधी यांचे जामात रॉबर्ट वढेरा यांच्यावर डीएलएफ कंपनीने विशेष वरदहस्त ठेवून काही जमीन व्यवहार केल्याचे प्रकरण त्या वेळी गाजले होते. खरे तर सध्याच्या नैतिकोत्तम सत्ताधीशांकडून सोनिया गांधी यांच्या या दशमग्रहास कडक शासन होईल अशीच सगळ्यांची अपेक्षा असणार. योग्यच ती.

पण तसे काही झाले नाही. उलट ते प्रकरण मागे पडले. यामागे सदर रोखे आहेत किंवा काय अशी शंका कोणास आल्यास ते अयोग्य असेल काय? यात महाराष्ट्राने विशेष दखल घ्यावी अशी नोंद म्हणजे वरोरा- चंद्रपूर- बल्लारपूर टोल रोड लिमिटेड ही कंपनी. या कंपनीने स्वत:स साडेचार कोटी रुपयांचा तोटा असताना सत्ताधाऱ्यांस सात कोटी रुपयांचे रोखे दिले. पायाभूत सोयीसुविधा क्षेत्रातील कंपन्या रोखेधर्मात अधिक दानशूर असाव्यात असे दिसते. 'धारिवाल इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड' कंपनी स्वत: साधारण ३०० कोटी रुपयांनी तोट्यात असताना ११५ कोटी रुपयांचे रोखे ती खरेदी करते ही विशेष कौतुकाची बाब! असे दाखले द्यावे तितके थोडे.ते सर्व पाहून पडणारा प्रश्न एकच. स्वत:च्या तिजोरीस खार लावून या इतक्या भरभक्कम देणग्या देण्याची गरज या कंपन्यांस का वाटली असेल? भरपूर नफा कमावणाऱ्याच्या मनात अशी दातृत्व भावना दाटून आली असेल तर ते समजून घेता येण्यासारखे. पण या कंपन्यांकडे दातावर मारायला नफा नाही, सरकारी कर भरायला निधी नाही आणि तरी त्या कोटी कोटी रुपयांच्या देणग्या कशा काय देतात?अगदी अलीकडेपर्यंत चंद्र/सूर्य ग्रहण सुटले की गावा-गाव 'दे दान, सुटे गिऱ्हाण' असे हाकारे घालत याचक दारोदार येत अणि श्रद्धाळू त्यांना यशाशक्ती दानधर्म करत. यातील उद्योगपतीही असेच श्रद्धाळू आहेत हे मान्य केले तरी त्यांचे असे कोणते 'गिऱ्हाण' लागले/सुटले की त्यांनी इतका दानधर्म करावा, हा प्रश्न. विद्यामान सरकारने एखादी समिती वगैरे नेमून ही चौकशी केल्यास सत्ताधीशांची प्रतिमा उजळण्यास मदत होईल. त्यासाठी नवनैतिकवादी आवश्यक तो दबाव आणतील, ही आशा.

–संकलन–
**राजेंद्र श्रावण वखरे**
(वृत्त संपादक)
निसर्ग चक्र

# कलाकारण: वास्तुरचना, वारसा आणि वास्तव!

प्रभाकर बरवे यांनी कागदावरल्या एका चित्रात राजाबाई टॉवर रेखाटला-रंगवला आहे, ते चित्र एका लिलावसंस्थेच्या संकेतस्थळावर आहे. पण हे चित्र फारच अपवादात्मक.

**अभिजीत ताम्हणे**

साध्या इमारती, रोजच्या वापरातली बांधकामं, यांच्याकडे दृश्यकलावंतांचं तरी लक्ष आहे, असा दिलासा मिळण्याचे प्रसंग अनेकदा आले आहेत. प्रभाकर बरवे यांनी कागदावरल्या एका चित्रात राजाबाई टॉवर रेखाटला-रंगवला आहे, ते चित्र एका लिलावसंस्थेच्या संकेतस्थळावर आहे. पण हे चित्र फारच अपवादात्मक. एरवी बरवे यांच्या चित्रांमध्ये अशा प्रसिद्ध इमारती नसायच्या. म्हणजे, बरवेंच्या चित्रांत कधी कधी इमारती असायच्या- त्या मुंबईतल्याही असायच्या; पण या इमारती आपल्या सर्वांच्या रोजच्या पाहण्यात असतात तशा साध्याच असायच्या. उंच इमारतींचे तपशील रंगवणं बरवे पूर्णच टाळायचे – पण एकमजली, दुमजली कौलारू इमारतींचे जिने, कठडे, दारं हे सारं अगदी तपशीलवार नोंद केल्यासारखं असायचं. बरवे यांच्या एका चित्रात अशीच एक दुमजली इमारत दिसते आणि बरवेंना ओळखणारे लोक म्हणतात, 'त्यांनी गिरगावातल्या छोटया खोलीत घेतलेला स्टुडिओ याच इमारतीत होता!'

सुधीर पटवर्धनांच्या चित्रांमध्येही इमारती आहेत. मुंबईच्या किंवा आसपासच्या उपनगरांतल्या इमारती, गेल्या दशकभरातल्या 'अनदर डे इन ओल्ड सिटी' सारख्या चित्रांमध्ये तर पुण्याच्याही इमारती.

पण त्यांच्या चित्रांमध्ये थेट इमारती येण्याच्याही आधीपासून वास्तुरचनेचे तपशील होते. हे तपशील सार्वजनिक जागांवरचे होते. उदाहरणार्थ, पटवर्धनांच्या ज्या चित्राची छापील आवृत्ती 'राष्ट्रीय आधुनिक कला संग्रहालया'त सहज मिळते, त्या 'ट्रेन' या चित्रात दादर स्टेशनवरच दिसणाऱ्या पुलाचा कठडा आहे. तो अत्यंत विशिष्ट असा तपशील आहे. पण एकेका इमारतीपेक्षा शहररचनेकडे पटवर्धनांनी पाहिलं. त्यातून एकाच चित्रचौकटीत निरनिराळ्या प्रकारच्या इमारती आल्या. झोपडया- चाळी- उंच इमारती असा भेद किंवा चकचकीत नव्या, रंगीबेरंगी, डिझायनर आकारांच्या इमारतींबरोबरच किमान ५० वर्ष जुन्या, काळाला तोंड देत टिकलेल्या इमारती यांमधला ताणही त्यांनी चित्रांमध्ये आणला. 'लोअर परळ'सारख्या चित्रात, आता पाडून टाकण्यात आलेला तो पूलही (आता) अजरामर झाला.

या दोघा महाराष्ट्रीय ज्येष्ठ चित्रकारांनी आपापल्या कलाविषयक भूमिकांमधून आपल्या आसपासच्या 'साध्या' इमारती चितारल्या, हे इथं आपल्यासाठी महत्त्वाचं. बरवेंच्या चित्रांमधल्या इमारती या बरवे यांची दृश्यनिर्मिती असतात. नितीन कुलकर्णीसारखे बरवे यांना जवळून पाहिलेले अभ्यासक कदाचित सांगतील- फळाचा फळपणा, कबुतराचा पक्षीपणा जसा बरवे यांना चित्रामध्ये आणायचा होता तसाच इमारतीचा इमारतपणा त्यांनी चित्रात आणला. पटवर्धनांच्या चित्रांमध्ये शहर, माणसं, इमारती यांचं नातं दिसतं. इथं बरवे आणि पटवर्धनांची तुलना करण्याचा प्रश्नच येत नाही, तसा हेतूही नाही. उलट, या दोघांच्या चित्रांमधल्या इमारतींना एकंदर चित्रविचाराचे संदर्भ होते, हे लक्षात ठेवण्यासारखं आहे.

**हे वैविध्य टिपणं महत्त्वाचं!**

याउलट, चित्रविचाराचे असे संदर्भ अजिबात नसूनही साध्या वास्तुरचनांचं दृश्यांकन आधुनिक/ समकालीन कलेत झालेलं आहे. हे काम 'डॉक्युमेण्टरी मोड' किंवा 'दस्तावेजीकरण शैली'चा भाग मानलं जातं. अशा कामाचं उत्तुंग उदाहरण म्हणजे ब्रेन्ड आणि हिला बेचर या दाम्पत्यानं टिपलेली छायाचित्रं. औद्योगिक प्रकल्पांमधल्या पाण्याच्या टाक्या, मोठया औद्योगिक प्रकल्पांतल्या गोल आकाराच्या इंधनटाक्या, शीतकरण संयंत्र किंवा तत्सम हेतूसाठी औद्योगिक प्रकल्पांमध्ये आढळणारी बांधकामं, किंवा- 'जर्मनीतल्या सीगेन प्रांतामधील खाण-कामगारांची घरे' यांसारख्या बांधीव रचनांचे फोटो त्यांनी टिपले. एखाद्या प्रकारच्या बांधकामातल्या विविध तऱ्हा दाखवणारे सहा, नऊ किंवा १५ फोटो एकाच फ्रेममध्ये मांडून प्रदर्शित करायचे, अशी पद्धतही त्यांनी पाळली. 'टायपॉलॉजी' किंवा विधाविचार करणारं हे काम आहे, असा निर्वाळा समीक्षकांनी दिला. अमुक एखाद्या प्रदेशातच दिसणारे औद्योगिक उभारण्यांचे किंवा काही वेळा वास्तु-रचनांचे प्रकार त्यांनी टिपले. अनोळखी लोकांचे एकाच ठरावीक पद्धतीनं पासपोर्ट फोटो पाहिल्यासारखं वाटू शकतं प्रेक्षकांना, हे बेचर दाम्पत्याचं काम पाहताना. पण त्यातून जे साध्य झालं, ते आणखी निराळं होतं. भोवतालातलं 'साधं वास्तव' आपण टिपायचं आहे- या वास्तवदर्शनात प्रत्यक्ष मानवाकृती नसल्या तरी, ते मानवनिर्मित आणि माणसांसाठी उभारलं गेलेलं काहीतरी आहे. त्या उभारणीत ज्या काही तऱ्हा दिसतात त्यासुद्धा प्रयोगशीलता/ रूढीप्रियता, सौंदर्यनिर्मितीची आस/ कामचलाऊपणा अशा दोन टोकांच्या मोजपट्टयांवरल्या विविध बिंदूंवर असतील. हे वैविध्य टिपणं महत्त्वाचं आहे, असा दृश्यकलावंतांचा विश्वास या बेचर दाम्पत्यानं पुढे नेला. त्यातून फोटोग्राफीत तरी बेचर यांच्यानंतर एका शैलीची वाट रुंद होत गेली. ब्रेन्ड बेचर यांचा जन्म १९३१ सालचा आणि ते वारले २००७ साली. त्यांच्या पत्नी हिला जन्मल्या १९३४ मध्ये आणि निवर्तल्या २०१५ च्या ऑक्टोबरात. तिशी-चाळिशीत या दाम्पत्यानं ज्या उभारण्यांचे फोटो काढले होते, त्यापैकी बऱ्याच टाक्या, बरेच वीजखांब, बरीचं संयंत्रं ही २००५ च्या आधीच नामशेष झाली होती. बेचर दाम्पत्याच्या हातून, औद्योगिकीकरणाचा वास्तुवारसा टिपण्याचं कामही नकळत झालं होतं.. हा वास्तुवारसा काही प्रसिद्ध नव्हता, त्याला कुणी 'हेरिटेज' वगैरे मानलं नाही, पण या वास्तू इथं होत्या, आता त्या नाहीत, जेव्हा त्या होत्या तेव्हा आपापल्या वैशिष्टयपूर्णतेनं त्या मानवी प्रयत्नांचं सातत्य आणि वैविध्य यांचा मेळ दाखवून देत होत्या!

**दिल्लीचा वास्तू-इतिहास -**

याच वाटेवरला पुढला टप्पा 'दिल्ली मेट्रो'ची उभारणी होऊ लागली तेव्हा अक्षरश: गचकन, अचानक दिल्लीत आला. दिल्ली हे खरं तर समृद्ध वास्तुवारशाचं शहर. लोधी, मुघल, ब्रिटिश वास्तूंखेरीज पांडवकालीन पुराना किलासुद्धा इथेच. पण या शहरातले दृश्यकलावंत आता इथल्या तुलनेनं कमी प्रसिद्ध असलेल्या वास्तूंकडेही आस्थेनं पाहू लागले. दिल्ली मेट्रोच्या कारशेडमुळे उद्धवस्त होणाऱ्या गरीबवस्तीची (झुग्गी-झोपडयांची) कहाणी 'राक्स मीडिया कलेक्टिव्ह'च्या प्रयत्नांमुळे तेव्हाच्या 'सराइ' या संस्थेच्या संकेतस्थळावर दृश्य-शब्द स्वरूपात येऊ लागली होती. त्याच सुमारास जिजी स्कारिआ या दिल्लीवासी शिल्पकार- फोटोआधारित चित्रकारानं गुडगाँवच्या उंच इमारती, एकमेकांवर कुरघोडी केल्यासारखे उड्डाणपूल यांतून बदलणारं शहर आपल्या कलाकृतींत आणलं होतं. (आपल्या मुंबईत, 'कॅम्प'नं वरळी-हाजीअली भागात ड्रोन कॅमेरे लावून केलेली व्हिडीओ-कलाकृती ही जिजीच्या त्या कामापेक्षा अधिक चटकन आठवणारी ठरते, असो). दिल्लीच्या प्रगती मैदानातली 'हॉल ऑफ नेशन्स' ही तुलनेनं प्रसिद्ध इमारत पाडली जाणार, हे जाहीर झाल्यावर सारेच हळहळले.. त्या इमारतीचं लाकडी प्रतिरूप (मॉडेल) खुद्द आर्किटेक्ट राज रेवाल यांच्याकडून दिल्लीच्या 'किरण नाडर म्यूझियम ऑफ आर्ट'नं मिळवलं आणि संग्रहित केलं. ही नाहीतरी प्रख्यात इमारत, पण अलीकडे दिल्लीचं 'सरोजिनी नगर' (दिल्लीकर उच्चार 'सरोजनी नगर') ही सरकारी कर्मचाऱ्यांची वसाहत उद्धवस्त करून तिथं टोलेजंग इमारती उभ्या राहिल्या, तेव्हा जुन्या वसाहतीतल्या इमारती टिपणारं, त्या वसाहतीचा मूळ आराखडा, तिथे जेव्हाकेव्हा मानवी वावर होता तेव्हाचे फोटो अशा अनेक दृश्य-दस्तऐवजांचं प्रदर्शन रोहित राज मेहंदिरत्ता यांनी मांडलं. ते प्रदर्शन थेटच वास्तुरचना-इतिहास प्रकारातलं होतं. अशा प्रकारचा (किमान स्वत:चा तरी) वास्तुरचना- इतिहास जपण्यासाठी कुकरेजा असोशिएट्स या वास्तुरचना कंपनीनं 'कुकरेजा फाउंडेशन'ची स्थापना केली, त्यामार्फत दिल्लीचे दृश्यकलावंत विशाल के. दार यांनी 'जेएनयू'ची वास्तुरचना- प्रतिरूपं यंदाच्या (फेब्रुवारीत पार पडलेल्या) दिल्लीतल्या 'इंडिया आर्ट फेअर'मध्ये मांडली होती.. पण हे एवढंच नव्हतं. विशाल दार यांच्या या छोटेखानी प्रदर्शनाचं नाव 'द मास्टरप्लान" असं होतं.. 'जेएनयू"तल्या बऱ्याच इमारतींची रचना करणाऱ्या कुकरेजांनी त्याआधी या संपूर्ण परिसराचा जो बृहद्आराखडा सरकारला प्रस्ताव म्हणून सादर केला होता, तो पुढे पुस्तिकारूपानं छापला गेला. ती पुस्तिकाही इथं होती. विद्यापीठ हे ज्ञानकेंद्र आहेच पण हा विद्यार्थी आणि विद्वज्जन यांच्या मुक्त वावराचा परिसर आहे, याची जाणीव त्या आराखडयात होती. केवळ एक वास्तुरचना आधी होती आता नसणार, अशा प्रकारची शोकजाणीव (लॅमेन्ट) विशाल के. दार यांची नव्हती.. जेएनयूतल्या इमारती तर पाडल्या नाहीत अजून. पण त्या आराखडयामागची जाणीव कुठे आहे, असा प्रश्न विशाल के. दार यांनी मूकपणे, सूचकपणे उपस्थित केला.

**गतवास्तवाची जाणीव -**

चित्रकाराच्या जाणिवांतून, त्याच्या स्व आणि समाजविषयक भूमिकेतून सिद्ध झालेली चित्रं असोत की 'आर्किटेक्चरल हिस्ट्री' असो.. त्यातून दृश्यबद्ध झालेल्या साध्यासुध्या इमारती – ज्यांना 'वारसा-वास्तूचा दर्जा' मिळणं अशक्यच असतं अशा पण जगण्याचा भाग असलेल्या इमारती- प्रत्यक्षात नामशेष होतात, त्याबरोबर जगण्याचा पोतही बदलत असतो. वास्तव पालटत असतं. 'कालौघात हे व्हायचंच" असं त्यावर कुणीही म्हणू शकेल पण त्या कालौघात आपण किती गमावतो याचा हिशेब दृश्यकलेच्या विविध प्रकारांतूनही ठेवला गेला आहे, जात असतो.

वास्तुरचनांसह भूतकाळात जमा झालेल्या वास्तवाचा वारसा आपल्याला या दृश्यकलाकृतींतून मिळणार असतो. हे सगळं आठवण्याचं कारण म्हणजे, मुंबईतली अख्खी 'एअर इंडिया कॉलनी" हल्लीच पाडली गेली. एक जीवनशैली संपली. त्यावर वरीलपैकी कुठल्याही प्रकारानं काम झाल्याचं ऐकिवात नाही.

## PM किसानचा १७ वा हप्ता हवा असेल तर आधी 'हे' काम करा, अन्यथा हप्त्यापासून राहाल वंचित

केंद्र सरकारच्या विविध योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारावी या हेतूने सरकार शेतकऱ्यांना मदत करत असते. अशीच एक योजना म्हणजे पंतप्रधान किसान सन्मान निधी योजना या योजनेच्या माध्यमातून सरकार शेतकऱ्यांना प्रतिवर्षी ६००० रुपयांची आर्थिक मदत देते. ही मदत शेतकऱ्यांनी हप्त्यात दिली जाते. आत्तापर्यंत शेतकऱ्यांच्या खात्यात१६ हप्ते जमा झाले आहेत. १७ वा हप्ता कधी मिळणार याची अपेक्षा आहे. दरम्यान, तुम्हाला जर १७ वा हप्ता हवा असेल तर काही महत्वाची काम आत्ताच तुम्हाला करावी लागतील अन्यथा १७ वा हप्ता तुम्हाला मिळणार नाही.

सरकारनं आत्तापर्यंत पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेचे १६ हप्ते शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा केले आहेत. लवकरच १७ वा हप्ता देखील शेतकऱ्यांना मिळणार आहे. दरम्यान,शेतकऱ्यांना १७ वा हप्ता मिळण्यापूर्वी जमिनीची पडताळणी करणं आवश्यक आहे. त्यासंदर्भातील कागदपत्रे अपडेट करणं गरजेचं आहे, अन्यथा तुम्हाला १७ वा हप्ता मिळणार नाही. तसेच अनेक शेतकऱ्यांनी अद्याप ई-केवायसी देखील केली नाही. शेतकऱ्यांनी लवकरात लवकर ई-केवायसी करणं गरेजचं आहे. अन्यथा त्यांचा १७ वा हप्ता मिळणार नाही. तसेच तुम्ही पंतप्रधान किसान सन्मान निधीसाठी अर्ज भरताना काही चूक केली असेल, म्हणजे नाव, किंवा चुकीचे लिंग, आधार कार्ड क्रमांक अशा काही चुका केल्या असतील तर तुमच्या खात्यावर पंतप्रधान किसान सन्मान निधीचा ७ वा हप्ता जमा होणार नाही. याची काळजी सर्व शेतकऱ्यांनी घ्यावी. २०१९ मध्ये मोदी सरकारनं ही योजना सुरु केली

सरकारनं शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारावी यासाठी पंतप्रधान किसान सन्मान निधी योजना सुरु केली. २०१९ मध्ये मोदी सरकारनं ही योजना सुरु केली होती. या योजनेअंतर्गत थेट शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा केली जाते. प्रत्येकी चार महिन्याला लाभार्थी शेतकऱ्यांच्या खात्यात २००० रुपये जमा केले जातात. दरम्यान, याच धर्तीवर महाराष्ट्र सरकारनं देखील शेतकऱ्यांना वार्षिक ६०००रुपयांची मदत देण्याचा निर्णय घेतला आहे.

**भरपूर पाणी प्या उन्हाचा तडाखा वाढलाय** पान नं. १ वरुन... तापमान नियंत्रित करण्याच्या यंत्रणेत बिघाड होताना दिसतोय. कोणत्याही सुरक्षेशिवाय उन्हामध्ये फिरल्यास उष्माघाताचा त्रास होण्याची शक्यता डॉक्टरांनी व्यक्त केली आहे.

एप्रिल आणि मे महिन्यांमध्ये उष्णता वाढत असल्याने नागरिकांना उलटी, चक्कर, निर्जलीकरण, बेशुद्ध पडणे, उष्माघात असा त्रास होतो. मागील काही दिवसांपासून मुंबईमध्ये उन्हाचा तडाखा वाढल्याने नागरिक हैराण झाले आहेत.

दरम्यान, मुंबई, रायगड आणि ठाण्यात आज उष्णतेच्या लाटेचा इशारा हवामान खात्याकडून देण्यात आला आहे. यासह कमाल तापमान हे ३६ ते ३८ अंश सेल्सिअसपर्यंत जाण्याची शक्यता आहे.

वाढत्या कडाक्याच्या उन्हामुळे नागरिकांना काम असेल तर घराबाहेर पडा आणि भरपूर पाणी प्या, असं आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात आलं आहे.उन्हामध्ये तापमान नियंत्रित ठेवणारी यंत्रणा शरीरात असते.

या यंत्रणेचे कार्य विस्कळीत झाल्यास नागरिकांना उन्हाचा त्रास होतो. त्यामुळे उन्हाच्या तडाख्यामध्ये शरीराचे तापमान नियंत्रित ठेवणारी यंत्रणा सुरळीत ठेवण्यासाठी सातत्याने पाणी पिणे आवश्यक असते.

वाढत्या उष्णतेमुळे नागरिकांनी येत्या काळात अधिक काळजी घेण्याची आवश्यकता असल्याचे आवाहन हवामान विभागाकडूनही करण्यात येतंय.

# सी-लिंकवरुन थेट दक्षिण मुंबईत जाता येणार

## ‘बो आर्क गर्डर’ दोन दिवसांत जोडणार

कोस्टल रोड आणि सी-लिंक आता थेट कनेक्ट होणार आहेत. यामुळं वाहतुक कोंडीची समस्या सुटणार आहे. मुंबईकरांची वाहतूक कोंडीतून सुटका व्हावी यासाठी प्रशासनाकडून अनेक प्रयत्न केले जातात. प्रशासनाकडून मुंबईत मेट्रो, उड्डाणपुल यांचे जाळे उभारण्यात येत आहेत. मुंबई महापालिकेचा महत्त्वकांक्षी प्रकल्प असलेल्या कोस्टल रोड आता लिंक रोडला जोडण्यात येत आहे. या प्रकल्पामुळं कोस्टल रोडवरुन थेट वरळी सी-लिंकवर प्रवास करता येणार आहे. त्यामुलं वाहतुककोंडीही कमी होणार आहे. या पुलाचे काम वेगाने सुरू असून येत्या काही दिवसांत गर्डर बसवण्यात येणार आहे.

वरळी सी-लिंक जोडण्यासाठी पिलर ७ आणि ९च्या मध्ये देशातील सर्वात मोठा आणि ३० बोइंग जेट वजनाइतका दोन हजार टनांचा बो आर्क गर्डर २ ते ३ दिवसांत बसवण्यात येणार आहे. कोस्टल रोड प्रकल्पातील हा सर्वांत आव्हानात्मक टप्पा आहे. बो आर्क गर्डर हा संपूर्ण स्टील बनावटीचा असलेला हा गर्डर पुढील १०० वर्षे टिकेल इतका मजबूत आहे. येत्या १७ किंवा १८ एप्रिलदरम्यान हा गर्डर बसवण्यात येणार आहे. यावेळी अरबी समुद्रातील भरती आणि ओहोटीच्या वेळा पाहूनच काम करण्यात येणार आहे.

१३६ मीटर लांब असलेल्या गर्डरमुळं कोस्टल रोड आणि वांद्रे वरळी सी-लिंक यातील कनेक्टिव्हिटी वाढणार आहे. तसंच दक्षिणेकडील चार बाजूच्या लेन खुल्या होणार आहेत.

या गर्डरचे एकूण वजन दोन हजार टन इतके असून १३६ मीटर लांब आहे. पुलाच्या एकूण गर्डरपैकी चार गर्डर आधीच लाँच करण्यात आले आहेत. तर, दोन गर्डर एप्रिलमध्ये लाँच करण्याची शक्यता आहे.

मरीन ड्राईव्ह ते वरळीपर्यंतचा कोस्टल रोडचा पहिला टप्पा सुरू करण्यात आला आहे. आता लवकरच प्रियदर्शनी पार्क ते वरळीदरम्यान कोस्टल रोड मेपर्यंत खुला करण्याचे पालिकेचे नियोजन आहे. त्यादृष्टीने वेगाने काम सुरू आहे. कोस्टल रोड आणि सी-लिंकदरम्यान तयार होणाऱ्या पुलाचे अंतर ८५० मीटर रुंद आणि २७० मीटर रुंद आहे. त्यामुळं वरळी येथे कोस्टल रोडला सी-लिंकची कनेक्टिव्हिटी मिळणार आहे.

सी-लिंक आणि कोस्टल रोड कनेक्ट झाल्यानंतर थेट दक्षिण मुंबईत येता येणार आहे. वांद्रे येथून दक्षिण मुंबईत येणाऱ्या वाहनांना सध्या सी-लिंक वरळीला जिथे संपतो तिथे वाहतुक कोंडीचा सामना करावा लागणार नाही. मे महिन्यापर्यंत पुलाची ही सर्व कामे संपून हा मार्ग सुरू करण्याचा प्रशासनाची तयारी आहे, अशी माहिती समोर येतेय.

# महाराष्ट्रात पाणीटंचाईचे संकट

## धरणातील पाणीसाठा होतोय कमी, ‘या’ शहराने उचलले कठोर पाऊल

पुणे : उन्हाच्या तीव्र झळांमुळं नागरिक हैराण झाले आहेत. त्यातच पाणीसाठ्यातही झपाट्याने घट होत आहे. धरणातील पाणीसाठा वेगाने कमी होत आहे. पाणी संकटाची चाहूल लागली असतानाच पुणे महापालिकेने आत्तापासूनच मोठी पावलं उचलली आहेत. पालिकेने पाणी टंचाईसाठी काही नियमावली जारी केल्या आहेत.

देशात मोठ्या प्रमाणात पाणीसंकट तीव्र होत चालले आहे. बेंगळुरुनंतर महाराष्ट्रातील बहुतांश भागात पाण्याची टंचाई आहे. धरणातील पाणीसाठा कमी होत चालला आहे. आत्ताच समोर आलेल्या माहितीनुसार, महाराष्ट्रातील धरणातील पाणीसाठा ३२.७२ टक्क्यांनी कमी झाला आहे. तर, पुण्यातील चार मोठे धरणं खडकवासला, टेमघर, पानशेत आणि वरसगाव यात गतवर्षी १२.९१ टीएमसी पाणीसाठा होता. मात्र, या वर्षी या चार धरणांत १०.३१ टीएमसी पाणीसाठा आहे. महाराष्ट्र जलसंपदा विभागाच्या एका अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, गतवर्षीच्या तुलनेने यंदा कडक उन्हाळा आहे. तसंच, पावसानेही यंदा ओढ दिली होती. त्याचाच परिणाम म्हणजे धरणातील पाणीसाठा कमी झाला आहे. महाराष्ट्रातील १३८ मोठ्या धरणातील पाणीसाठा फक्त ३२.७२ टक्के इतका आहे. धरणातील पाणीसाठा कमी होत असताना आणि तीव्र जलसंकट असताना पुणे महानगरपालिकेने पाणी जपून वापरण्याचे आवाहन केले आहे.

पालिकेने काही नियमावली जारी केल्या आहेत. त्यानुसार, कार वॉशिंग सेंटरने पालिकेने दिलेले पाणी गाड्या धुण्यासाठी न वापरण्याचे निर्देश दिले आहेत. पीएमसीने सीवेज ट्रिटमेंट प्लांटचे पाणी बांधकाम कामांसाठी वापरण्याच्या सूचनाही जारी केल्या आहेत.

महाराष्ट्रातील धरणांचा पाणीसाठा महाराष्ट्रात एकूण १३८ मोठी धरणे असून त्यापैकी १७ पूर्णपणे कोरडी आहेत; २३ मध्ये १०% पेक्षा कमी पाणीसाठा आहे; २० मध्ये ५०% पेक्षा जास्त पाणीसाठा आहे. त्यानंतर उर्वरित धरणांमध्ये २० ते ४० टक्के पाणीसाठा आहे.

राज्यातील विविध विभागात पाण्याची परिस्थिती काय?

राज्यातील विविध विभागात पाण्याची खालावत चाललेली पातळी हा चिंतेचा विषय आहे. महाराष्ट्रातील मराठवाडा विभागात सर्वात कमी १९.3६ टक्के इतका पाणीसाठा आहे. पुणे विभागानंतर ३६.३४ टक्के तर, नागपूर विभागात 4८.८४ टक्के, अमरावती विभाग ४९.६२ टक्के, नाशिक विभाग ३८.१७ टक्के आणि कोकण विभागात ५०.५० टक्के इतका पाणीसाठा आहे.

टँकरची मागणी वाढली

पाणी टंचाईची भीषण परिस्थिती असताना टँकरची मागणी वाढत चालली आहे. गावांत टँकरने पाणी पुरवठा करण्यात येत आहे. सुस, महाळुंगे, पिसोळी, होळकर वाडी, फुरसुंगी, उरुळी आणि कातारी या भागातील पाण्याची मागणी पूर्ण करण्यासाठी पीएमसी सध्या ३४ पैकी ११ गावांना ३०० पाण्याचे टँकर आणि उर्वरित २३ गावांना ८00 पाण्याचे टँकर वितरित करत आहे.

★★★

# ऊस, कांदा आणि सोयाबीन

## महाराष्ट्रातील ३ नगदी पिकं एकाचवेळी अडचणीत का आली?

१९ एप्रिल ते१ जून २०२४ याकाळात देशाच्या इतिहासातली सगळ्यात मोठी निवडणूक होणार आहे. सुमारे ९७ कोटी मतदार या निवडणुकीत मतदान करतील. यात सगळ्यात मोठा वाटा शेतकऱ्यांचा असेल. असं असलं तरी निवडणुकीच्या प्रचारात शेतकऱ्यांच्या मुद्द्यांना किती महत्त्व दिलं जातं हा खरा प्रश्न आहे.

महाराष्ट्राचा विचार केला तर असं दिसून येतं की शेतकऱ्याला पैसे मिळवून देणारी पिकं म्हणून ज्या नगदी पिकांचा प्रचार केला गेला. त्यापैकी ऊस , कांदा आणि सोयाबीन पिकवणाऱ्या शेतकऱ्यांवर सध्या संकट कोसळलं आहे. साखरेपासून इथेनॉल निर्मितीवर घातलेले निर्बंध, कांद्याच्या निर्यातीवर घातलेली बंदी आणि सोयाबीनच्या पडलेल्या (पाडलेल्या) भावामुळे मागच्या काही वर्षांमध्ये या पिकांकडे वळलेला शेतकरी अडचणीत सापडला आहे.

ऊस, सोयाबीन आणि कांद्याचे प्रश्न शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे असले तरी त्यांचा निवडणुकीत किती विचार केला जातो? ही पिकं घेणारा शेतकरी अडचणीत का सापडलाय?

महाराष्ट्रात कोणकोणत्या जिल्ह्यांमध्ये ही पिकं घेतली जातात? सरकारचं या तिन्ही पिकांबाबत नेमकं धोरण काय आहे? आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे लोकसभा निवडणुकीत मतदान करताना शेतकरी या मुद्द्यांचा विचार करतात का? या सगळ्या प्रश्नांची उत्तरं या बातमीच्या माध्यमातून आपण जाणून घेण्याचा प्रयत्न करणार आहोत.

सोयाबीनचे भाव का पडलेत?

सामान्य नागरिकांना खाद्यतेल स्वस्तात मिळावं यासाठी केंद्र सरकारने मोठ्या प्रमाणावर सोयाबीन, सूर्यफूल आणि पामतेल आयात केलं.

त्यामुळे देशातील तेलाचे भाव कमी झाले पण याचा परिणाम शेतकऱ्याला या पिकांच्या मिळणाऱ्या मोबदल्यावरही झाला.

सोयाबीन हे पारंपारीक पीक नसतानाही महाराष्ट्रातील शेतकरी सोयाबीन का पिकवू लागला? याबाबत बोलताना ज्येष्ठ पत्रकार प्रदीप नणंदकर म्हणतात की, मागच्या २०वर्षांपासून महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशातला शेतकरी सोयाबीन पिकवू लागला. आधी सूर्यफूल पिकवलं जायचं पण त्या पिकाला भाव मिळत नव्हता.

त्यामुळे याला पर्याय म्हणून सोयाबीन आलं. त्याकाळात सूर्यफुलाची उत्पादकता चांगली होती, भाव चांगला मिळत होता. पण गेले दोन-तीन वर्ष झाले सोयाबीनचे भाव पडले आहेत. त्याकडे कुणाचंही लक्ष नाही.

सोयाबीन फोटो स्रोत,

ठमहाराष्ट्रात विदर्भ आणि मराठवाड्यात सोयाबीन प्रामुख्याने पिकवलं जातं. सोयाबीनचे भाव हे बाजार ठरवतं.

२०१९ मध्ये सोयाबीनच्या भावात विक्रमी वाढ झाली होती. पण त्यासाठी आंतरराष्ट्रीय बाजार जास्त करून जबाबदार होता.

भारतातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्याला भाव मिळावा यासाठी केंद्र सरकारने आयात-निर्यातीच्या धोरणात सरकारने हस्तक्षेप केला.

पीक परिस्थितीचं धोरण बघून जर सरकारने आयात-निर्यातीचे धोरण ठरवलं तर शेतकऱ्याला चांगला भाव मिळू शकेल.

सोयाबीनच्या शेतात काम करणाऱ्या महिला फोटो स्रोत,

फोटो कॅप्शन,सोयाबीनच्या शेतात काम करणाऱ्या महिला

भाव पडल्याचा परिणाम निवडणुकांवर होतो का? शेतकरी सोयाबीनच्या मुद्द्यावर मत कुणाला द्यायचं हे ठरवतात का? याबाबत बोलताना नणंदकर म्हणाले की, ठमध्य प्रदेशात महाराष्ट्रापेक्षा जास्त सोयाबीनची शेती केली जाते. तिथेही शेतकऱ्याच्या सोयाबीनला फारसा भाव मिळाला नाही, शेतकरी नाराज होते पण विधानसभेच्या निवडणुकीत त्याचा फारसा फरक पडला नाही.

शेतकऱ्यांच्या प्रश्नावर शेतकरी संघटित होत नाहीत म्हणून शेतकऱ्यांच्या प्रश्नांना राजकारण्यांकडून किंमत दिली जात नाही.

२०१३ साली सोयाबीनला प्रतिक्विंटल ६००० रुपये भाव मिळावा म्हणून शेतकरी नेते पाशा पटेल यांनी दिंडी काढली होती. त्या दिंडीला आता अकरा वर्षे होऊन गेली पण अजूनही शेतकऱ्याला चार ते साडेचार हजार रुपये भाव मिळतो.

खाद्यतेलावर पाच टक्के आयातशुल्क आकारलं जातं. मात्र परदेशातून आयात होणाऱ्या सोयाबीनवर आयात शुल्क आकारलं गेलं नाही आणि त्याचा फटका देशातल्या सोयाबीन उत्पादक शेतकऱ्याला बसला. यावर्षी सोयाबीन उत्पादनात 30 ते 40 टक्क्यांची घट झाली आहे. गेल्यावर्षी खरिपात कमी पाऊस झाल्यामुळेही सोयाबीनचं उत्पादन कमी झालं.

सोयाबीन हे शेतकऱ्याचं पीकच नाही, हे सरकारी पीक आहे’

सध्या महाराष्ट्रात सुमारे४२ लाख हेक्टरवर सोयाबीनचं पीक घेतलं जातं. पण एवढ्या मोठ्या प्रमाणात उत्पादन होऊनही शेतकरी फायद्यात का नसतो यावर बोलताना लातूर जिल्हयातील औसा तालुक्यातल्या तपसे चिंचोलीमध्ये शेती करणारे महेश पाटील म्हणतात की, सोयाबीन हे शेतकऱ्याचं पीकच नाही. हे सरकारी पीक आहे. कराव्या लागतात. त्यावर सरकारला प्रति एकर १००० ते १५०० रुपयांचा जीएसटी भरावा लागतो.कोणताही शेतकरी फक्त एक एकर सोयाबीन पिकवत नाही. त्यामुळे एक एकरावर सोयाबीन पेरायचं असेल तर शेतकऱ्याला बी-बियाणं, कीटकनाशकं आणि इतर गोष्टी खरेदी कराव्या लागतात. त्यावर सरकारला प्रति एकर १००० ते १५०० रुपयांचा जीएसटी भरावा लागतो.कोणताही शेतकरी फक्त एक एकर सोयाबीन पिकवत नाही. त्यामुळे यातून सरकारला भरघोस उत्पन्न तर मिळतच पण शेतकऱ्याचा खर्च वाढतो. सोयाबीन तुम्ही घरी खाऊ शकत नाही. त्यामुळे बाजारात आहे त्या भावाला विकण्याशिवाय पर्याय नसतो. आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा विचार केला तर परदेशात सोयाबीन पिकवण्यासाठी खूपच कमी खर्च येतो कारण तिकडे बी-बियाण्यांवर प्रगत संशोधन झालं आहे.

आपण अनेक महत्त्वाची पिकं आयात करतो सरकारने जे देशात खाल्ल्या जाणाऱ्या पिकांना योग्य भाव दिला तर शेतकरी सोयाबीनच्या फेऱ्यातून वाचू शकेल आणि इतर पिकांकडे वळू शकेल.

ऊस उत्पादक शेतकरी संकटात का सापडलाय?

७ डिसेंबर २०२३ ला इथेनॉल निर्मितीसाठी साखरेचा वापर करण्यावर केंद्र सरकारने बंदी घातली होती. सरकारच्या या निर्णयाला खूप मोठ्या प्रमाणात विरोध झाला आणि त्यानंतर काही दिवसांनी संपूर्ण बंदी उठवून काही प्रमाणात इथेनॉल निर्मिती करण्यास मान्यता देण्यात आली.

देशांतर्गत साखरेच्या किंमती नियंत्रणात ठेवण्यासाठी आणि साखरेचा पुरेसा पुरवठा रहावा म्हणून इथेनॉल निर्मितीवर निर्बंध घालण्यात आले आहेत.

देशातली संभाव्य साखर टंचाई टाळण्यासाठी म्हणून हा निर्णय घेतल्याचं स्पष्टीकरण केंद्र सरकारने दिलं असलं तरी या निर्बंधांमुळे मागच्या काही महिन्यात देशातील साखर उद्योगाचं सुमारे तीन हजार कोटींचं नुकसान झालं आहे.

ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा एकूण अनुभव पाहता मागच्या काही वर्षांमध्ये इथेनॉल निर्मितीमुळे उसाची थकबाकी वेळेवर मिळण्यात शेतकऱ्यांना मोठी मदत झाली आहे. अर्थात कारखानदारांकडून इथेनॉलच्या निव्वळ उत्पन्नाच्या महसुलातून शेतकऱ्यांनी किती पैसे दिले जातात, याविषयी स्पष्ट माहिती दिली जात नाही, असं शेतकरी संघटनांचं म्हणणं असलं तरी इथेनॉलमुळे साखर उत्पादकांना आणि अंतिमत: शेतकऱ्यांना फायदा झालाय, असं केंद्र सरकारच्या अहवालातच सांगण्यात आलंय.

अवकाळी पावसामुळे उसाच्या पिकाचं नुकसान फोटो स्रोत,

२०२१-२२ मध्ये३५ लाख मेट्रिक टन साखर इथेनॉल उत्पादनासाठी वळवण्यात आली होती.

१५डिसेंबर२०२३ इथेनॉल निर्मितीवरील बंदी उठवताना केंद्र सरकारने २०२३-२४ या वर्षासाठी देशातील १७ लाख मेट्रिक टन साखर वापरून रस आणि बी हेवी मोलॅसीस इथेनॉल निर्मिती करण्यास परवानगी दिली होती.

इथेनॉल निर्मिती अर्ध्यावर आल्यामुळे सध्या देशात सुमारे साडे पाच लाख लिटर मेट्रिक टनाचा साठा शिल्लक आहे. इथेनॉल निर्मितीवर बंदी घातल्यामुळे पेट्रोलमध्ये१० टक्के इथेनॉल मिसळून वापरण्याचे केंद्र सरकारचं धोरणही संकटात सापडलं आहे.

शेतकऱ्यांना इथेनॉल निर्मितीचा फायदा होतो का?

महाराष्ट्रात ऊसाचा दर दोन पातळ्यांवर ठरवला जातो. एक, दरवर्षी केंद्र सरकारकडून ऊसासाठी एफ आर पी जाहीर होते. दुसरं, सी. रंगराजन समितीच्या शिफारशीनंतर महाराष्ट्रात महाराष्ट्र ऊस दर नियंत्रण मंडळ स्थापन करण्यात आले. हे मंडळ एफ आर पी शिवाय शेतकऱ्यांच्या ऊसाला आणखी दर कसा देता येईल, यासाठी वर्षातून ठराविक काळात बैठका घेत असतं. त्यानुसार जर एखादा कारखाना केवळ साखरेचं उत्पादन करत असेल त्यांनी वर्षभरात विकलेल्या साखरेचा महसूलाच्या ७५ टक्के वाटा हा शेतकऱ्यांनी देणं अपेक्षित आहे. तर संबंधित साखर आणि उप-पदार्थांचं उत्पादन, उदाहरणार्थ इथेनॉल, तर त्यांनी वर्षातील एकूण महसुलाच्या ७0 टक्के वाटा हा शेतकऱ्यांना देण अपेक्षित आहे. याबाबत बोलताना शेतकरी नेते राजू शेट्टी यांनी बीबीसी मराठीला सांगितलं होतं की, ठबरेचसे कारखानदार हे केवळ ऊसाच्या उताऱ्यानुसार देतात.

कारखाना जर इथेनॉलचं उत्पादन करत असेल तर त्यांनी वर्षांत इथेनॉलमधून कमावलेल्या महसुलाचा वाटा शेतकऱ्यांना देतो की नाही हे तपासावं लागणार आहे. त्यासाठी रेव्हेन्यू शेअरिंग फॉर्म्युला फेरविचार करणं गरजेचं आहे.

कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत का सापडलाय?

कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे प्रश्न काय आहेत यावर बोलताना महाराष्ट्र कांदा उत्पादक शेतकरी संघटनेचे अध्यक्ष भारत दिघोळे म्हणाले की, २०२३ च्या सुरुवातीपासून कांद्याचे भाव कमी होत गेले. हे भाव एवढे कमी झाले की कांदा उत्पादक संघटनेला २७ फेब्रुवारीला मोठं आंदोलन करावं लागलं.

त्यावेळी महाराष्ट्र सरकारने कांदा उत्पादक शेतकऱ्याला ३५०रुपयांचं अनुदान दिलं. हे अनुदान २०० क्विंटलपर्यंत होतं. त्यानंतर जुलै महिना संपता संपता कांद्याच्या दरात किंचित वाढ होऊ लागली.ऑगस्टमध्ये कांद्याला २१००रुपये प्रतिक्विंटल भाव मिळाला. त्यानंतर केंद्र सरकारने १९ ऑगस्ट २०२३ ला ४० निर्यातशुल्क लागू केलं आणि कांद्याचे भाव कमी झाले. ऑक्टोबर महिन्यात पुन्हा भाव वाढू लागले आणि सरकारने एक नवीन नोटिफिकेशन काढून किमान निर्यात मूल्य ८०० डॉलरवर नेले आणि परत दर नियंत्रित केले गेले.डिसेंबर२०२३मध्ये पुन्हा अवकाळी पाऊस झाला आणि सरकारने ७ डिसेंबरला कांद्यावर निर्यातबंदी लागू केली.त्यावेळेस असं सांगण्यात आलं होतं की ही निर्यातबंदी ३१ मार्च २०२४ पर्यंत असेल. त्यानंतर खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांचं वाटोळं व्हायला सुरुवात झाली. ७ डिसेंबरला काढलेला आदेश शेतकऱ्यांपर्यंत पोहोचायला ८ डिसेंबर उजाडलं आणि एका दिवसात शेतकऱ्याला मोठा फटका सहन करावा लागला.

उदाहरणार्थ निर्यातबंदी ज्या दिवशी लागू झाली त्यादिवशी ३००० ते ४००० रुपये भाव होता पण त्याच्या दुसऱ्याच दिवशी हे भाव २००० रुपये प्रतिक्विंटल एवढे झाले. कांदा उत्पादक शेतकरी फोटो स्रोत,

दरम्यान शेतकऱ्यांसाठी लढणाऱ्या संघटनांनी आंदोलनं केली. त्यानंतर त्यांनी मध्येच काही प्रमाणात कांद्याची निर्यात करायला परवानगी दिली. त्यात खाजगी निर्यातदारांना निर्यात करण्याची परवानगी दिली नाही.

सरकारने किती निर्यात केली याबाबतची स्पष्ट आकडेवारी कुठेही उपलब्ध नाही. कारण त्या निर्यातीमुळे कांद्याचे भाव वाढले नाहीत. आता २२ मार्चला ही निर्यातबंदी अनिश्चित काळासाठी वाढवण्यात आलेली आहे.

शेतकऱ्यांची मागणी काय आहे?

ग्राहकांना स्वस्तात कांदा मिळाला पाहिजे याला आमचा विरोध नसल्याचं दिघोळे सांगतात. ते म्हणतात की, जसे ग्राहक या देशाचे नागरिक आहेत त्याचप्रमाणे शेतकरी देखील याच देशाचे नागरिक आहेत. आम्ही म्हणत नाही की ग्राहकांनी १००-२०० रुपये मोजून एक किलो कांदा खरेदी केला पाहिजे पण मग ५,१०रुपये किलो हा भाव शेतकऱ्यांसाठी खूपच कमी नाही का?

आम्हाला आमच्या लागवडीपेक्षा किमान काही पैसे तरी जोडून आलेच पाहिजेत. गरिबांना कांदा परवडत नसेल तर सरकारने रेशनिंगवर कांदे दिले पाहिजेत पण शेतकऱ्याला मिळणारे दोन पैसे कमी करून सरकारला नेमकं काय मिळणार आहे?

देशातली महागाई कमी करायची असेल तर फ्लॅटच्या किंमती कमी करा, पेट्रोल डिझेलच्या किंमती कमी करा.

तुम्हाला भाव कमी करताना फक्त शेतकरीच कसा दिसतो. बरं शेती करताना बियाणं आमचं, शेती आमची, कष्ट आमचं तरीही आम्हाला आमचा भाव दिला जात नाही.

शेतकरी सन्मान निधीचे ६००० जास्त की २,५०,००० लाख जास्त?

भारत दिघोळे म्हणाले की, ठआताचं सरकार शेतकऱ्याला वर्षाला ६००० रुपये देतं. जर समजा माझ्याकडे ५०० क्विंटल कांदा असेल आणि त्याचे मला ५ लाख रुपये मिळणार असतील तर निर्यातबंदीमुळे मला त्याचे अडीच लाख रुपयेच मिळाले. तर याचा अर्थ असा होतो की तुम्ही माझे अडीच लाख खाल्ले आणि दिले किती तर ६०००. तर तुम्हीच सांगा ६००० जास्त की २,५००००?

थोडक्यात काय तर सध्या महाराष्ट्रात ऊस, सोयाबीन आणि कांदा पिकवणाऱ्या शेतकऱ्यांच्या शेतमालाला भाव मिळत नाही.

कधी इथेनॉल निर्मितीवर बंदी, कधी आयातीत वाढ तर कधी निर्यातबंदीच्या सरकारी निर्णयामुळे शेतकरी संकटात सापडला असला तरी प्रदीप नणंदकर म्हणतात त्याप्रमाणे, त्याचं प्रतिबिंब निवडणुकीत पडेल की नाही हे मात्र सांगता येणार नाही.

# मांजरीला वाचवताना ६ जण बायोगॅसच्या खड्ड्यात बुडाले

अहमदनगर : येथे धक्कादायक घटना घडली आहे. नेवासा येथे मांजरीला वाचवताना सहाजण बायोगॅसच्या खड्ड्यात बुडाले आहेत. बुडालेल्यांना बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरु आहेत. नेवासा तालुक्यातील वाकडी येथे ही घटना घडली आहे. बायोगॅसचा खड्डा शेणाने भरलेला होता. सहाजण बुडाल्याची माहिती मिळाल्यानंतर घटनास्थळी एकच खळबळ उडाली होती. पोलीस आणी तहसीलदार घटनास्थळी दाखल झाले आहेत. यादरम्यान बुडालेल्या सहा जणांना बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, बायोगॅसच्या खड्ड्यात एक मांजर पडली होती. तिला वाचवण्यासाठी एकजण खाली उतरला होता. यावेळी तो बुडू लागल्याने इतरजण मदतीला धावले. पण त्याला वाचवताना इतर सहाजणही बुडाले आहेत. घटनास्थळी बचावकार्य सुरु असून त्यांना बाहेर काढण्याचे प्रयत्न शर्थीने सुरु आहेत. दरम्यान एकाला बाहेर काढण्यात यश आलं असून, त्याला तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

बुडालेल्या सर्वांची ओळख पटली आहे. माणिक गोविंद काळे, संदीप माणिक काळे, बबलू अनिल काळे, अनिल बापूराव काळे आणि बाबासाहेब गायकवाड अशी त्यांची नावं आहेत. ★★★

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीदिनी मतदान जनजागृतीचा जागर!

**कल्याण :** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार ,महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आजच्या जयंतीदिनी ठिकाठिकाणी त्यांना अभिवादन करून अनेकविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आजच्या जयंती दिनाचे औचित्य साधून, 24 -कल्याण लोकसभा मतदारसंघांतर्गत 142 कल्याण पूर्व विधानसभा मतदारसंघातील स्विप पथकाने महापालिकेचे शिक्षणाधिकारी विजय सरकटे यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्श हॉस्पिटल, गणेश कृपा सोसायटी येथे त्याचप्रमाणे श्री गुरुदेव दत्त सोसायटी, कोळशेवाडी परिसर येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या



जयंती दिनानिमित्त निमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात उपस्थित नागरिकांसमोर मतदान जनजागृती करीत मतदानाचे महत्त्व बिंबविण्यात आले तसेच मतदान जनजागृतीपर गीत वाजवून मोठ्या प्रमाणावर उपस्थित असलेल्या नागरिकांना मतदान करण्यासाठी आवाहन करण्यात आले आणि सर्वांच्या वतीने मतदानाची शपथ घेण्यात आली.

## आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी सर्व यंत्रणांनी सांघिक भावनेने व समन्वयाने काम करावे! - निवडणूक निर्णय अधिकारी सुषमा सातपुते

सर्व उमेदवारांना व पक्षांना समान संधी मिळण्याच्या दृष्टीने त्याचप्रमाणे मतदारांना प्रोत्साहित करण्यासाठी आणि अनुचित पद्धतीच्या वापरावर निर्बंध आणण्यासाठी सर्व यंत्रणांनी सांघिक भावनेने व समन्वयाने काम करावे असे उद्गार २४- कल्याण लोकसभा मतदार संघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी सुषमा सातपुते यांनी आज काढले. २४-कल्याण लोकसभा मतदारसंघाच्या वै. ह. भ. प. सावळाराम महाराज म्हात्रे क्रीडा संकुलातील निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात आज सकाळी ठसीझर कमिटीच्याठ नोडल अधिकाऱ्यांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते, सदर बैठकीस संबोधित करताना सुषमा सातपुते यांनी हे प्रतिपादन केले. लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीची आचार संहिता जाहीर झाल्यापासून



म्हणजे दिनांक १६ मार्चपासून एफएसटी टीमचे काम सुरू झाले आहे या टीमने आक्षेपार्ह रोकड, लिकर ,भेटवस्तू इ.सापडल्यास कशा प्रकारे कारवाई करावी याच्या सूचना संबंधित बैठकीतील उपस्थित समन्वय अधिकारी यांना देण्यात आल्या,त्याचप्रमाणे या कार्यवाहीसाठी आयकर विभाग,जीएसटी विभाग,राज्य उत्पादन शुल्क व पोलीस विभाग या सर्वांचे प्राधिकृत अधिकारी यांचे सहकार्य अपेक्षित आहे तरी सर्वांनी त्यांना नेमून दिलेल्या जबाबदाऱ्या पार पाडाव्यात अशाही सूचना निवडणूक निर्णय अधिकारी सुषमा सातपुते यांनी बैठकीत उपस्थित असलेल्या अधिकारी वर्गास दिल्या.सदर बैठकीस पोलीस खात्याचे वरिष्ठ प्रतिनिधी, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे समन्वय अधिकारी, १४४ कल्याण ग्रामीण मतदार संघाचे सहा.निवडणूक निर्णय अधिकारी विश्वास गुजर, २४-कल्याण लोकसभा मतदार संघाच्या सहा. निवडणूक निर्णय अधिकारी वैशाली लंभाते, खर्चाचे नोडल अधिकारी दिलीप सूर्यवंशी, सहा.खर्च निरीक्षक शरद देशमुख,24 कल्याण लोकसभा मतदार संघ अंतर्गत असलेल्या सर्व विधानसभा मतदार संघाच्या आदर्श आचारसंहिता पथकांचे समन्वय अधिकारी उपस्थित होते.

## पाचवीही मुलगीच झाली, आई-वडिलांनी कट रचला; चौथीची जिभ कापली, पाचवीची हत्या करून मृतदेह पुरला, मुंब्र्यातील भयावह घटना

मुंब्रा : दीड वर्षाच्या चिमुरडीचा हत्या १८ मार्च २०२४ रोजी घडली तर चिमुरडी लबीबा शेख हिच्या हत्येनंतर दाम्पत्यांनी १९ मार्च रोजी रात्री २.३० वाजण्याच्या सुमारास मृतदेह पुरला.

दोन मुले आणि तिसऱ्या मुलीनंतरही आणखी दोन मुली झाल्याने १८ महिन्याच्या मुलीची हत्या केली आणि तिचा मृतदेह पुरला. तर दुसऱ्या मुलीची जीभ कापणाऱ्या आई नुरानी जाहीद शेख (२८), वडील जाहीद सलामत शेख (३८) याना मुंब्रा पोलिसांनी बेड्या ठोकल्या. या नराधमांनी पाचवीही मुलगी झाल्याने आणि आजारी असल्याने मुलीची हत्या केल्याची आणि तिचा मृतदेह पुरल्याची कबुली दिली.

दीड वर्षाच्या चिमुरडीचा हत्या १८ मार्च २०२४ रोजी घडली तर चिमुरडी लबीबा शेख हिच्या हत्येनंतर दाम्पत्यांनी १९ मार्च रोजी रात्री २.३० वाजण्याच्या सुमारास मृतदेह पुरला. मात्र ४ एप्रिल रोजी संतोष महादेव या बनावट नावाने प्राप्त झालेल्या अर्जमुळे खुनाचा गुन्हा उघडकीस आला. अटक दाम्पत्याना न्यायालयात नेले असता १८ एप्रिल पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने पोलिसांना दिले.

मुलीची हत्या अन् मृतदेह पुरला

मुंब्रा पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेला हत्येचा गुन्हा लपविण्यासाठी मृतदेह पुरून मोकळे झालेल्या नराधम दाम्पत्याला बनावट नावाने केलेल्या अर्जाची दाखल मुंब्रा पोलिसांनी घेत खुनी आई-वडिलांना कौशल्यपूर्ण तपासात जाळ्यात अडकविले.




सदरचा हत्येचा गुन्हा हा आई नुरानी नाहीद शेख (२८) आणि वडील जाहीद सलामत शेख (३८ ) यांनी मोठ्या शिताफीने करून मृतदेह पुरला. मृतक लबीबा हिच्या डोक्यावर आणि डोक्याच्या मागे गंभीर जखम करत हत्या केली. मयत चिमुरडी लबीबा ही आरोपी दाम्पत्याची पाचवी मुलगी होती. मेडफॉर्ड हॉस्पिटल व अलमास हॉस्पिटलमध्ये या दाम्पत्याने जखमांचे कारणे दाखवून वेळ मारून नेली. मात्र रक्तस्त्राव झाल्याने लबीबा हीच मृत्यू १८ मार्च रोजी झाला. तर १९ मार्चला मृतदेह कौसा कब्रस्तान येथे पुरला. त्यानंतर मुंब्रा पोलिसांना निनावी प्राप्त अर्जाद्वारे संशय व्यक्त केल्याने पोलिसांनी वैद्यकीय अवहाल तपासले त्यात विसंगती आढळली. तर चुकीची माहिती देत दाम्पत्यांनी मृत्यू दाखलाही मिळवला.

मुंब्रा पोलिसांनी तपस करत संशयावरून आई नूरानी आणि वडील जाहिद यांची कसून चौकशी केली. अन सत्य बाहेर पडले. मुंब्रा पोलिसांनी दाम्पत्याच्या विरोधात गुन्हा दाखल करून आरोपीना अटक केली. शेवटच्या झालेल्या दोन मुली हबीब आणि लबीबा दाम्पत्याला नको होत्या. यापूर्वी हबीबा हिची जीभ कापल्याप्रकरणी झारखंड राज्यात या दाम्पत्यावर गुन्हा दाखल असलायची माहिती पोलिसांनी दिली.

सदरच्या घटनेनंतर २८ दिवसात खून पचल्याचा आनंद दाम्पत्याला झाला. मात्र याच दरम्यान मुंब्रा पोलिसांना बनावट नावाने अर्जदार संतोष हरिलाल महादेव नावाने प्राप्त झालेल्या अर्जाची दखल घेत पोलिसांनी प्रकरणाची चौकशी सुरु केली. अन् आरोपी गालाला लागले. त्यांना न्यायालयात नेले असता १८ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी ठोठावण्यात आली.

# निसर्गाची तीन रूपे

स्थूल भौतिक असलेली सृष्टी पृथ्वी, जल, वायू आणि आकाश तत्त्वांची समष्टी आहे. ज्यामध्ये सत्त्व, रज आणि तम तीन गुण असतात. माणसाचे भौतिक अस्तित्वसुद्धा ही पंचतत्त्वे आणि तीन गुणांची समग्रता आहे. निसर्गामध्ये ज्या प्रमाणात तत्त्वे असतात तेच प्रमाण मानवशरीरातही असते.

आपण म्हणजे सृष्टी आणि तिचा एक हिस्सा आहोत, हे सर्वप्रथम समजून घेतले पाहिजे. त्याच परिमाणात जीवनाची एक अभिव्यक्तीसुद्धा आहोत. सृष्टी नष्ट झाली तर परिणामी माणूसही नष्ट होईल. आदिवासी समाजात आणि ग्रामीण लोकसंस्कृतीत दीर्घकाळ काही कार्य करत असताना माझा ओढा आदिवासी समाज आणि लोकजीवनात माणूस आणि निसर्गाचा काय संबंध आहे? हे जाणून घेण्याकडेच अधिक होता.या संबंधाचे स्वरूप जीवनामध्ये कसे उत्पन्न होत असेल? माणूस आणि निसर्गाच्या या संबंधाने त्यांची जीवनशैली आणि धार्मिकतेचे रूप उमटले आहे काय?दोन्ही क्षेत्रांत जीवनाच्या एका दीर्घ परंपरेत मनुष्याचे निसर्गाबरोबरचे संबंध अभिन्नता आणि परस्परतेच्या दोन स्वरूपात समजून घेता येऊ शकतात. आदिवासी समाज निसर्गाबरोबर



जोडलेलाच आहे. ते निसर्गाला आपल्यापेक्षा वेगळ्या स्वरूपात कधीच पाहत नाहीत. आपल्या राहण्या खाण्याच्या पद्धतीलाच ठनिसर्ग' असे म्हणतात. त्यांची दैनंदिन दिनचर्या उलट आध्यात्मिक धार्मिक जीवन आणि देवता, मातृशक्ती आणि पूर्वजसुद्धा ठनिसर्गाच्या सान्निध्यात वास' करतात. ते त्यांच्यापासून वेगळे राहत नाहीत. नैसर्गिक शक्तीचेच रूप तेथे देव आणि मातृशक्ती हे आहे.निसर्गाची धार्मिकता म्हणजे धर्म हाच एक जीवनानुभव आहे. वेगळी धर्मसत्ता नाही. 'आदिवासी देवलोक'च्या अभ्यासातून ही बाब स्पष्ट होते. येथे सृष्टी हीच एक विशाल निसर्ग आहे. यात माणूस निसर्ग आणि देवतेसोबत जगतो आणि राहतो. येथे निसर्ग इतका परिपूर्ण असतो की दिव्यतेचा एखादा लोक किंवा स्वरूप नसते. जीवन आणि जीवनाचे बोध उन्मेष कालखंडापासून ते आतापर्यंतच्या आदिवासी समाजात मनुष्य आणि निसर्गाची ही अभिन्नता आतापर्यंत अस्तित्वात आहे. ग्रामीण समाजात मात्र माणूस आणि निसर्गाची ही एकता तुटते. येथे माणूस आणि निसर्ग वेगळा आहे. मनुष्य त्याचा आदर करतो. त्याच्या अनेक रूपाची पूजा करतो. लोकांच्या आयुष्यात नैसर्गिक शक्तीबरोबरच एका विशाल पौराणिक धार्मिकतेचा उदय आणि विकास होतो. जीवन आणि देवत्व स्वर्गाहून वेगळे होतात. येथे पावन निसर्ग वंदनीय आणि पूजनीय आहे. मानव आणि निसर्गाच्या या संबंधात एक अद्भुत प्रेम आणि परस्परता असते. यापासूनच लोकसमाजात निसर्ग जीवनाचा आधार बनते. ती नष्ट करता येत नाही. त्यापासून इतकेच ग्रहण करता येते. त्याचे वेगळे जतन करून ठेवता येत नाही.या परस्पर अद्भुत जीवनसंबंधात प्रत्यक्षात लोकांचा सहजधर्म, सांस्कृतिक परंपरा आणि कलेच्या रचनेचे मर्म समाविष्ट असते. हेच कृषी आणि शेतकऱ्यांच्या संस्कृतीचा आधार आहे. या जीवनाला नांगरधारी' आणि ठगोपाल'चे अद्भुत मिश्रण प्रकट होते. नागर समाजरचनेत मनुष्य आणि निसर्गाच्या आधी दोन्ही रूपे हळूहळू निघून जातात. मनुष्य निसर्गापासून वेगळा राहू शकत नाही. यामुळे त्यात राहणाऱ्या माणसाकडे निसर्गाचे विराट स्वरूप आणि श्रद्धेच्या पावनतेचा संबंध ठेवून सृष्टी वेगळी राहू शकत नाही. ती एक भौतिक साधन बनते.आपल्या अहंकार आणि लालचमध्ये मनुष्य मूळ निसर्गाचा स्वामी होतो. तो स्वत:लाच सृष्टी आणि जीवनाचे केंद्र समजू लागतो. नागरी परंपरेच्या जीवनरचनेत जोपर्यंत उत्पादनाची पद्धत विविध पारंपरिक कौशल्यापर्यंतच केंद्रित असते तोपर्यंत सृष्टी संतुलित असते. मात्र, जसा नफा केंद्रित यंत्र उत्पादनात ती मानवनिर्मित मर्यादित होऊन हळूहळू नष्ट होते.

सृष्टी शोषणाचा विषय आणि एक मूळ संसाधन बनवली जाते. आता तर ती सृष्टी पूर्णपणे तशा प्रकारची राहिलीच कोठे? ती पर्यावरणाच्या संकटात सापडली आहे. यामुळेच मानव संकटात आहे. माणसांनीच आपल्या हाताने रचलेल्या या महाविनाशावर पुनर्विचार करा.

डॉ. कपिल तिवारी
मध्य प्रदेश आदिवासी आणि लोककला अकादमीचे माजी संचालक

# वाईन शॉपमध्ये लाखोंची चोरी करणारे अटकेत

डोंबिवली :- (सौ. सीमा वखरे) :- चोरीसाठी वाईन शॉपमध्ये नोकरीला लागला, लाखोंच्या दारूवर डल्ला मारला...

कल्याण शहरात सध्या गुन्ह्यांच्या घटना खूप वाढल्या आहेत. त्याचदरम्यान आता शहरातीन चोरीचा एक अजब गुन्हा समोर आला आहे. अधिकृत वाईन शॉपमधील लाखोंच्या मद्याच्या बाटल्या चोरी झाल्याची तक्रार पोलिसांत आली होती. त्याप्रकरणी शोध घेऊन पोलिसांनी ४ आरोपींना अटक केली आहे. धक्कादायक गोष्ट म्हणजे आरोपींपैकी एक हा त्याच वाईन शॉपमध्ये कामाला होता. फक्त दारूच्या बाटल्या चोरी करता याव्यात म्हणूनच तो या दुकानात कामाला लागला होता, अशी माहिती समोर आली आहे. त्याचे सहकारी दुकानात ग्राहक बनून दारू खरेदी करण्याच्या बहाण्याने आल्यावर त्यांना दुकानातील माल चलाखीने सोपवायचा. कल्याण गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी चौघांनाही बेड्या ठोकल्या आहेत.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, कल्याण पूर्वेतील कोळसेवाडी येथे अनिलकुमार भगवानदास बजाज यांचे मद्यविक्रीचे अधिकृत दुकान आहे. या दुकानातून गेल्या काही महिन्यांमध्ये एक ते दोन मद्याच्या बाटल्या अशा पद्धतीने एकूण सहा लाख ४० हजार रुपये किमतीच्या दारूच्या बाटल्या चोरीला गेल्या होत्या. दारु विक्रीचा हिशोब जुळून नसल्याने याप्रकरणी दुकानदार अनिलकुमार बजाज यांनी कोळसेवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. कल्याण गुन्हे शाखेच्या पथकाने या प्रकरणाचा तपास सुरू केला होता. मात्र हा गुन्हा दाखल होताच त्याच दुकानात काम करणारा सुनील नावाचा इसम फरार झाला होता.

याप्रकरणाचा तपास करताना कल्याण गुन्हे शाखेचे हवालदार गोरक्ष शेकडे यांना एक खबर मिळाली. या मद्य चोरीतील एक आरोपी सुनील हा उल्हासनगर येथे येणार आहे, अशी गुप्त माहिती



मिळाली. वरिष्ठ निरीक्षक नरेश पवार यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार दत्ताराम भोसले, गोरक्ष शेडगे, गुरुनाथ जरग, बालाजी शिंदे, विलास कडू, दीपक महाजन, चालक अमोल बोरकर यांच्या पथकाने शनिवारी उल्हासनगर परिसरात सापळा लावला. ठरल्या वेळेत आरोपी सुनील त्या भागात येताच पोलिसांनी झडप घालून त्याला अटक केली. तपासादरम्यान सुनीलने त्याचा गुन्हा कबूल केला. जी.के. या वाईन्स दुकानातून चोरून नेलेल्या महागड्या मद्याच्या बाटल्या इतर आरोपींसोबत संगनमत करून कल्याण, डोंबिवली परिसरातील ढाबे मालकांना विकल्याचेही त्याने सांगितले. त्या माहितीच्या आधारे पोलिसांनी इतर आरोपींचा शोध घेऊन त्यांना अंबरनाथ, उल्हासनगर भागातून अटक केली. पोलिसांनी आरोपींकडून चोरी केलेला लाखोंचा मुद्देमाल जप्त केला. धक्कादायक गोष्ट म्हणजे सुनील हा त्याच दुकानात काम करत होता. किंबहुना ही दारू चोरता यावी यासाठीच त्याने वाईन शॉपमध्ये नोकरी करण्यास सुरूवात केली होत. सुनीलचे इतर साधीदार आरोपी हे दारू खरेदी करण्याच्या बहाण्यान दुकानात यायचे. आणि तेव्हा सुनील हा चलाखीने त्यांना दुकानाचा माल थैलीत भरून त्यांना देत होता. आत्तापर्यंत आरोपींनी ६ लाख ४० हजार रुपये किमतीची दारू बाहेर विकली आहे. पोलिस याप्रकरणी अधिक तपास करत आहेत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक शिवम राजेंद्र वखरे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया,ॲण्ड पब्लिकेशन प्रा.लि.डब्ल्यू , २३०, टीसीसी इंडस्ट्रियल एरिया खैरणे,एम.आय. डी.सी., ठाणे - बेलापूर रोड ,नवी मुंबई,जि.ठाणे , पिन कोड.नं.४००७१०, येथे छापून फ्लॅट नं. २१९, पहिला मजला, एल.आय.जी. बिल्डींग नं. १६, बिर्ला कॉलेज समोर, चिकणघर, कोकण वसाहत, कल्याण (प.), ता. कल्याण , जि. ठाणे , पिन कोड.नं.४२१३०१ येथून प्रकाशित केले.(आर.एन.आय.नं. एम ए एच एम ए आर / २०२२/८३३३८ ) , **Mob. 09987496136**

Printed , Published , Owned & Editor : Shivam Rajendra Vakhare, Printed at SIDDHAKALA PRINT MEDIA & PUBLICATIONS PVT. LTD. , PLOT. No. W-230 , TTC Industrial Area , Khairne MIDC, Navi Mumbai- Dist. Thane.MAHARAHTRA- 400710 Published From - Flat no 219, First Floor, L.I.G. Blg No 16, Opp- Birla College Chikanghar, Kokan Vasahat, Kalyan (w), Taluka - Kalyan, Dist- Thane. Pin Code- 421301- (Maharashtra) **RNI.No. MAHMAR/2022/83338**